# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### विदर्भातील उद्योगांचे विज अनुदान व थकबाकी देणे बंद असल्याबाबत.

**(१) १३२६२ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाडा या औद्योगिकदृष्ट्या मागास असलेल्या भागात उद्योग सुरु करावेत या हेतूने माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यापासून या भागातील उद्योगांना वीज अनुदान देणे सुरू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यानपासून सदर उद्योगांना अनुदान तसेच थकबाकी देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, विदर्भ व मराठवाडा हे इतर विभागांच्या तुलनेत औद्योगीकदृष्टया मागासलेले असतानाही सदर अनुदान व थकबाकी बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर भागांतील उद्योगांची प्रगती होण्याच्या दृष्टीने विदर्भ मराठवाडयातील उद्योगांना वीज अनुदान व थकबाकी देणे पुन: सुरु करण्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरणची बिकट आर्थिक परिस्थिती व अनुदानाची अपूरी तरतूद लक्षात घेता तसेच शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ नुसार सवलतीची वार्षिक मर्यादा रु.१२०० कोटी संपुष्टात आल्यामुळे महावितरण कंपनीस सदर सवलत देणे शक्य झाले नाही.

(४)सन २०२१-२०२२ करीताची संपूर्ण सवलत रु.१२०० कोटी निर्धारीत करण्यात आली आहे व सदर सवलत सन २०२३-२४ पर्यंत राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील एकूण रस्ते अपघातांपैकी ४५ टक्के अपघात मुंबई शहरात झाल्याबाबत

**(२) १३७४१ (२५-०८-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण रस्ते अपघातांपैकी ४५ टक्के अपघात मुंबई शहरात झाल्याची बाब दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबई शहरातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- अपघात प्रवण ठिकाणी गतिरोधक व रम्ब्लर लावणे, रोड डिझाईनमध्ये बदल करणे, रस्ते दुभाजक लावणे, एकदिशा मार्ग व सम-विषम पार्किंग करणे या अपघात प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
- दरवर्षी जानेवारी/ फेब्रुवारी महिन्यामध्ये वाहनचालक व नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.
- अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने अपघाताचे विश्लेषणाबाबत विविध शासकीय/ खाजगी संस्थाकडून प्राप्त अहवालांच्या आधारे अपघात स्थळी करावयाच्या उपाययोजना BMC, MMRDA, MSRDC यांना वेळोवेळी सूचविण्यात येतात.
- मुंबईतील ३५ ब्लॅक स्पॉट येथे वाहतूक अधिकारी व रस्ते बांधणी तज्ञ भेट देऊन अपघात टाळण्याकरिता करावयाच्या उपाययोजना बृहन्मुंबई महानगरपालिका, MMRDA यांना कळविण्यात आल्या आहेत.
- अतिवेगाने वाहन चालविणे, ट्रिपल सिट, विरुध्द दिशेने वाहन चालविणारे बेशिस्त वाहनचालकांवर भादवि कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात येतात.
- शाळा, महाविद्यालयात वाहतूक नियमांबाबत तसेच रस्ता सुरक्षेबाबत वाहतूक शाखेमार्फत माहिती दिली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरी (जि.नांदेड) नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्यधिकारी देण्याबाबत

**(३) १४१२१ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्यधिकारी नसल्यामुळे शहरात पथदिवे बंद असणे, पाणीपुरवठा विस्कळीत होणे, कचऱ्याचे ढीग साचलेले असणे इ. समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून पथदिवे सुरु नसल्यामुळे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उमरी नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्यधिकारी देण्यासह येथील नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, उमरी नगरपरिषदेत दि.२१.०२.२०२२ रोजीपासून मुख्याधिकारी रुजू झाले आहेत. उमरी नगरपरिषद हद्दीतील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील कामे सुरळीत सुरु आहेत. तसेच शहरामध्ये सोलर पथदिवे बसविण्यात आले असून ते सुरळीत सुरु आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे पंचनदी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कोळंबी प्रकल्पधारकांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत**

**(४) १५०५३ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पंचनदी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीला आलेल्या पुराचे पाणी लगतच्या भूमापन क्र. ८०/२, ८०/३ व ८१/२ मध्ये शिरल्यामुळे सामान्य शेतकऱ्यांच्या कोळंबी प्रकल्पाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नुकसानीबाबतचा अहवाल सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी सादर केला असतानाही संबधित शेतकऱ्यांना अद्यापर्यंत शासनाकडून नुकसानभरपाई प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे , त्यानुषंगाने मौजे पंचनदी येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कोळंबी प्रकल्पधारकांना तातडीने नुकसानभरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०५-२०२३) :** (१) खरे आहे,
(२) व (३) खरे आहे,
विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.२४.०३.२०२३ अन्वये बाधित व्यक्तींना मदत देण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नवसंजिवनी योजनेंतर्गत मातृत्व अनुदान योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(५) १५०८० (०४-११-२०२२) श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवसंजीवनी योजनेंतर्गत मातृत्व अनुदान योजनेचा लाभ लाखो मातांना दिला जातो, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, नवसंजीवनी योजनेंतर्गत अदिवासी विकास विभागाच्या मातृत्व अनुदान योजनेचा निधी अखर्चित राहिल्याने लाखो माता सदर योजनेपासून वंचित राहिल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागातील मातृत्व अनुदान योजनेचा लाभ सर्व मातांना मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०६-२०२३) :** (१) होय.

(२) नाही. मार्च २०२२ अखेर ६९,८९५ मातांना लाभ देण्यात आला आहे.

(३) पात्र मातांना लाभ देण्यासाठी व अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी प्रकल्प विकास अधिकारी,आदिवासी विकास प्रकल्प यांचे कडे पाठपुरवठा करण्यात येतो आणि अनुदान प्राप्त होताच मातांना अनुदान देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात विकासकांकडून रस्त्याच्या कडेला तसेच नद्या आणि खाड्यांच्या किनाऱ्यालगत डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६) १५१७७ (२९-१२-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ११६०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात विकासकांकडून रस्त्याच्या कडेला तसेच नद्या आणि खाड्यांच्या किनाऱ्यालगत डेब्रिज टाकले जात असल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरात रस्त्याच्या कडेला, तसेच नद्या, खाड्यांच्या किनाऱ्यालगत डेब्रिज टाकून अतिक्रमण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०५-२०२३) :**

(१) मुंबई शहरात कुठेही डेब्रीज टाकलेले आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर डेब्रीज त्वरीत उचलले जाते. तसेच, अनधिकृतरित्या डेब्रीज टाकतांना प्रत्यक्ष आढळल्यास उपद्रव शोधकांमार्फत दंडात्मक कारवाई केली जाते.

(२) विकासकाद्वारे निर्माण झालेल्या दगडमातीच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. विकासकांना दगड माती सदर जागेवर वाहून नेण्याकरिता वाहतूक परवाना दिल्यानंतरच विकासकास आय.ओ.डी. देण्यात येते. वाहतूक परवाना मिळाल्यानंतर विकासक त्यांच्या अखत्यारीत दगड, विटा, मातीचा कचरा वाहून नेण्याकरिता कंत्राटदाराची नेमणूक करतात.

निर्माण होणारा कचरा ३०० MT पेक्षा कमी असल्यास “Debris on Call” ची सोय केलेली असून, दगड मातीचा असा कचरा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उचलला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पूर्व उपनगरातील मुलुंड पूर्वेकडे नीलमनगर जवळील ‘वासंती’ सोसायटी जागेत महावितरणचे असलेले ‘ललीत’ नावाचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बहुमजली टॉवर उभारताना विकासकाने पूर्णपणे पाडून अक्षरश: अडगळीत टाकून एका बंदिस्त जागेत धोकादायक स्थितीत ठेवल्याप्रकरणी सखोल चौकशी होऊन संबंधिताविरोधात कारवाई करण्याच्या मागणीबाबत...

**(७) १५१९५ (२८-१२-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) पूर्वेकडे असलेल्या नीलमनगर जवळील ‘वासंती’ सोसायटीच्या जागेत असलेले महावितरणचे ‘ललीत’ नावाचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बहुमजली टॉवर उभारताना संबंधित विकासकाने पूर्णपणे पाडून ते कोंदट अशा बंदिस्त जागेत ठेवले होते त्याचे ब्रेक्स दुरूस्त न केल्यास आपत्कालीन स्थितीत तेल आधारित असलेल्या या रोहित्रातून तेलाची अर्थात डिझेलची गळती होऊन भीषण स्फोट होण्याची भीती असल्याप्रकरणी महाराष्ट्र वीज कामगार कॉंग्रेसचे (इंटक) अध्यक्ष डॉ. संदीप वंजारी यांनी महावितरणाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणात महावितरण अधिकाऱ्याच्या निष्काळजीमुळे महावितरणचा महसूल बुडाला व दुसरीकडे प्राणहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याने यासाठी जबाबदार असलेल्या संबंधितांवर कायद्यानुसार चौकशीकरून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणीही सदरहू तक्रारीमध्ये स्पष्टपणे केली आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, याााबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वचा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :**

(१) याबाबतची लेखी तक्रार महावितरणकडे प्राप्त झाली आहे.

भांडुप नागरी परिमंडळातील ठाणे नागरी मंडलाअंतर्गत मुलुंड विभागातील नीलम नगर उपविभागाअंतर्गत ललीत नावाचे रोहित्र हे अंदाजे १९८७ पासून वासंती विहार इमारतीच्या मागील बाजूस सुरक्षा भंतीलगत एका रुममध्येच बसविण्यात आले होते. सदर इमारत पुर्नविकास करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत नियोजन विभागाकडून मिळालेल्या इमारत नकाशामंजुरीनुसार अग्निशमन दलाच्या गाडीस अडथळा होत असल्याने विकासकांनी सदर ललीत रोहीत्र स्थलांतरीत करण्याकरीता अर्ज केला. सदर रोहित्र स्थलांतरण व नवीन विद्युत भारासाठी ठाणे मंडल कार्यालयाने मंजुरी दिलेली आहे.

(२) चौकशी करुन कारवाईची मागणी तक्रारीमध्ये करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीव्दारे सखोल चौकशी केल्यावर मुलुंड पुर्वेकडे असलेल्या वासंती सोसायटीच्या जागेत महावितरणचे असलेले ललीत नावाचे रोहित्र बहुमजलीत टॉवर उभारणी केल्यानंतर विकासकाने बसवताना अनियमितता आढळुन आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर परिवहन महामंडळाच्या बस आगारासाठी इलेक्ट्रीक बसेस देण्याबाबत

**(८) १५८७९ (२९-१२-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने दिनांक १ जून, २०२२ पासून राज्यातील विविध विभागांमध्ये इलेक्ट्रीक बस चालू केल्या असून सोलापूर परिवहन विभागाने ५० इलेक्ट्रीक बसचा मागणी प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या विविध विभागात किती ई-बसेस सुरु करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर परिवहन विभागाला ५० ई-बसेस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) नाही.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या अहमदनगर व पुणे विभागात सद्यस्थितीत ०२ नियते प्रायोगिक तत्वावर चालविण्यात येत आहेत. विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या ५० ई-बसेस पुणे-नाशिक-पुणे, पुणे-सोलापुर-पुणे, पुणे-कोल्हापूर-पुणे, पुणे-औरंगाबाद-पुणे या मार्गांवर चालविण्याचे प्रस्तावित आहे.

सोलापूर विभागामार्फत १० नियते इलेक्ट्रिक बस करीता प्रस्तावित करण्यात आली आहेत.

---

## शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या सेवाप्रवेश नियमांबाबत

**(९) १६१३५ (२८-१२-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना नविन सेवाप्रवेश नियम लागू करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (३१-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सद्यस्थितीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संसथांमधील शिल्प निदेशक/ व्यवसाय निदेशक या पदांना शासन अधिसूचना दि. १८/११/१९८३ अन्वये मंजूर सेवाप्रवेश नियम लागू आहेत. तथापि, सदर प्रवेश नियमात कालानुरुप बदल करणे आवश्यक असल्याने सदर सेवाप्रवेश नियम सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३)प्रश्न उद्भवत नाही.

## विजयनगर, नालासोपारा (जि.पालघर) येथील वसई-विरार महानगरपालिका रुग्णालयाच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत

**(१०) १७०७७ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विजयनगर, नालासोपारा (जि.पालघर) येथील वसई-विरार महानगरपालिकेच्या रुग्णालयात हाडाच्या उपचारासाठी कार्यरत असलेल्या डॉक्टरांकडून गरीब सर्वसामान्य रुग्णांना बाहेरच्या मेडिकल स्टोअरमधून औषधे खरेदी करण्यासाठी चिठ्ठ्या लिहून दिल्या जात असून त्याद्वारे सर्वसामान्य गरीब रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गैरकारभाराची चौकशी होण्याबाबत ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे तसेच प्रधान सचिव, नगरविकास विभाग व आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसई-विरार महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या गैरकारभाराबाबत चौकशी करुन रुग्णांची आर्थिक लूट करणाऱ्या रुग्णालय प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०५-२०२३) :**
(१), (२) व (३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले असून सदर निवेदन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी यापूर्वीच पाठविण्यात आले आहे.

तथापि, सदरची बाब यापूर्वीच निदर्शनास आल्याने संबंधित डॉक्टर कडून खुलासा घेण्यात आल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. दरम्यान उपरोक्त प्रकरणी संबंधितांकडून घेण्यात आलेल्या खुलासामध्ये तथ्य आढळून न आल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात

आलेली नाही. तसेच सदर प्रकरणी आवश्यक त्या सूचना वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचल ( जि. रत्नागिरी ) येथील ग्रामपंचायतीत विदयुत कंपनी वरील भार व येणारे वीज बिल पाहता पवनचक्की प्रकल्प राबविणेबाबत.

**(११) १७३४५ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचल ( जि. रत्नागिरी ) येथील ग्रामपंचायतीने  विदयुत कंपनीवरील भार व येणारे वीज बिल याबाबत विचार करून  पवनचक्की प्रकल्प सामूहिकरित्या राबविण्यासाठी सभागृहात ठराव मंजूर केला आहे हे खरे आहे काय,
(२ ) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने  सदर पवन चक्की प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०२३) :** (१) होय. पाचल (जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीने विद्युत कंपनीवरील भार व येणारे वीजबिल याबाबत विचार करून पवनचक्की प्रकल्प सामुहिकरित्या राबविण्यासाठी दिनांक २३/०८/२०२२ रोजी ग्राम सभा ठराव मंजूर केला आहे.
(२) पाचल (जि.रत्नागिरी) येथे पवन चक्की प्रकल्प राबविण्याकरिता जागा उपलब्ध करण्यासाठी ग्रामपंचायत पाचल मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आयुष मंत्रालय स्थापन करणेबाबत

**(१२) १७६२५ (२५-०३-२०२३) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)  महाराष्ट्र राज्यात इतर राज्यांप्रमाणे  आयुर्वेद उन्नतीसाठी स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास , किती कालावधीत स्थापन होईल ,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी  केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात आयुर्वेद उन्नतीसाठी स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०६-२०२३) :**

(१), (२) व (३) राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातव्या वेतन आयोगामध्ये पी.एच.डी.च्या वेतन वाढ युजीसी प्रमाणे देण्याबाबत

**(१३) १७६३६ (२५-०३-२०२३) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचव्या व सहाव्या वेतन आयोगामध्ये युजीसी प्रमाणे पी.एच.डी प्राध्यापकांना अतिरिक्त वेतनवाढ दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातव्या वेतन आयोगामध्ये पी.एच.डी प्राध्यापकांना युजीसी प्रमाणे अतिरिक्त वेतनवाढी देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगामध्ये वेतनवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०४-२०२३) :**

(१) (२) व (३) हे खरे आहे.

पाचव्या व सहाव्या वेतन आयोगामध्ये पीएच.डी. अर्हतेच्या आगाऊ वेतनवाढी देण्यात येत होत्या. केंद्रीय मुनष्यबळ विकास मंत्रालयाने दि.०२.११.२०१७ च्या पत्रान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनसंरचना लागू केली आहे. त्यामध्ये पीएच.डी. अर्हतेच्या आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय करण्यात आलेल्या नाहीत. केंद्रीय मुनष्यबळ विकास मंत्रालयाच्या उपरोक्त पत्रातील तरतुदीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाची वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. सातव्या वेतन आयोगामध्ये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने पीएच.डी. अर्हतेच्या आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय केल्या नाहीत. त्यामुळे राज्यातील अध्यापकांना सदर आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय करण्यात आल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (हिंगोली) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या कार्यालयाचे बांधकाम तातडीने सुरु करण्याबाबत.

**(१४) १७७०० (२५-०३-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली व परभणी जिल्हयातील आदिवासी समाजाच्या विविध योजना राबविण्यासाठी कळमनुरी

(जि.हिंगोली) येथे १५ ऑगस्ट,२०१२ ला आदिवासी प्रकल्प कार्यालयास मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच या कार्यालयाच्या बांधकामासाठी ६ कोटी ४५ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मात्र केवळ भूमीपूजनाच्या कारणामुळे अद्याप या कार्यालयाचे बांधकामास सुरुवात झालेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या कार्यालयाचे बांधकाम तात्काळ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०५-२०२३) :**

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी जि. हिंगोली हे नवीन कार्यालय सुरु करण्यास शासन निर्णय क्रमांक आस्था-२०११/प्र.क्र.२१२ (भाग-२)/का.१५, दिनांक १८ जून, २०१२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी जि. हिंगोली या कार्यालयाच्या बांधकामसाठी रु. ६९१.५१ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सद्यस्थितीत प्रस्तुत कार्यालयाच्या इमारतीचे प्लिंथपर्यतचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. पुढील काम प्रगतिपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी समाजाच्या भाषेला अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा देण्याबाबत

**(१५) १८०२५ (२५-०३-२०२३) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाषिक अल्पसंख्यांक असणाऱ्या समाजास शिक्षण व इतर विभागात अल्पसंख्यांक समाजाचे फायदे देण्यात येत असल्याचे तसेच भाषिक अल्पसंख्यांकांनी स्थापन केलेल्या सेवाभावी संस्थेस/शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आदिवासी समाजाची भाषा अल्पप्रमाणात वापरात येत असून त्यास अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा देण्याबाबत तसेच आदिवासी समजाच्या विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावर “भाषिक अल्पसंख्यांक” अशी नोंद घेणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षणमंत्री आणि मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात आदिवासी समाजाच्या भाषेला अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०५-२०२३) :**

(१) हे अंशत: खरे आहे.

केंद्राच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था अधिनियम, २००४ मधील कलम १२ बी अनुसार राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना या विभागाच्या शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२०१२/ प्र.क्र.२१/का-५, दि.२७.०५.२०१३ अन्वये तसचे शासन शुध्दीपत्रके दिनांक १६.०८.२०१३/०३.१०.२०१३/१८.०६.२०१४/ ३०.०५.२०१७ अन्वये विहित केलेल्या अटी/शर्ती व कार्यपध्दतीनुसार धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यात येतो.

(२) आदिवासी समाजाच्या भाषांना अल्पसंख्यांक दर्जा देणे व या समाजाच्या विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावर भाषिक अल्पसंख्याक अशी नोंद घेणेबाबतची मागणी केल्याची निवेदने या विभागास प्राप्त नाहीत.

(३) आदिवासी समाजाच्या भाषेला अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा देण्याबाबत कोणतीही कार्यवाही या विभागात प्रस्तावित नाही.

(४) लागू नाही.

---

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा जवळ आल्या असुनही अद्यापर्यंत अभ्यासक्रमांची पुस्तके न मिळाल्याबाबत

**(१६) १८३४३ (२५-०३-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घरपोच पुस्तक सेवा सुरू केली असून मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा लवकरच सुरु होणार असल्याने मुक्त विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमांची पुस्तके विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत मिळाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, परिक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांचे पुस्तकाविना शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच कोरोना काळानंतर मुक्त विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना नियमित पुस्तके दिली जात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांची घरपोच पुस्तके मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रायोगिक तत्वावर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या पत्यावर पुस्तके पाठविण्यात आली होती. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षांपासून विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासकेंद्रांमार्फत पुस्तके उपलब्ध केली जातात. चालू शैक्षणिक वर्षासाठी सत्रनिहाय शिक्षणक्रमांची पुस्तके विद्यापीठाच्या विभागीय केंद्रामार्फत अभ्यासकेंद्रावर व अभ्यासकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आलेली आहेत. याशिवाय विद्यापीठात नव्याने विकसित केलेल्या व जुन्या सर्व शिक्षणक्रमांची पुस्तके सॉफ्टकॉपीव्दारे PDF/ E-book स्वरुपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

विद्यापीठामध्ये एम.ए. (अर्थशास्त्र) हा शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात आलेला आहे. या शिक्षणक्रमाच्या तिसऱ्या सत्राची पुस्तके काही तांत्रिक कारणामुळे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली नसल्यामुळे या शिक्षणक्रमाची फक्त तिसऱ्या सत्राची परीक्षा काही कालावधीकरिता पुढे ढकलण्यात आली आहे. वार्षिक पॅटर्नच्या शिक्षणक्रमाची पुस्तके मुद्रकाकडून अभ्यासकेंद्रावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून अभ्यासकेंद्राकडून विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठात नव्याने विकसित केलेल्या व जुन्या सर्व शिक्षणक्रमांची पुस्तके सॉफ्टकॉपीव्दारे PDF/E-book स्वरुपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. कोरोना काळात व कोरोना काळानंतरही विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना वेळेत पुस्तके देण्यात आली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील नदीवर पुल नसल्याने विद्यार्थी व रहिवाशांना पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याबाबत

**(१७) १८४७६ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील अनेक गांवातील रहिवासी तसेच शाळेतील विद्यार्थी यांना नदीवर पुल नसल्याने पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, नदीवर पुल बांधण्याबाबत तेथील जनतेने व लोकप्रतिनिधी यांनी राज्य शासनाकडे गेली अनेक वर्षापासून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने नदीवर पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०४-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) होय

(३) सदर भितारवाडी चाफेवाडी कोठेवाडी रस्ता हा ग्रामीण मार्ग ३५९ दर्जाचा रस्ता असून सदर रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. सदरचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या

अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामा व अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई येथे रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या मृत्यूबाबत

**(१८) १८६१२ (२५-०३-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामा व अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई येथे दि. दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास श्रीमती फरहा बेग या महिला रुग्ण उपचार घेत असतांना खाटेवरुन खाली पडून अत्यवस्थ झाल्या त्यावेळी वैद्यकीय अधिकारी व अधिसेविका उपस्थित नसल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याने सदर महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौ ेकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी अधिक्षक आणि मुख्य अधिसेविका तसेच जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०५-२०२३) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यशवंतराव चव्हाण मुक्त महाराष्ट्र विद्यापीठातील कुलगुरू आणि कुलसचिवांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) १८६९३ (२५-०३-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त महाराष्ट्र विद्यापीठात गत दहा महिन्यांपासून कुलगुरूंची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यापीठातील कुलसचिव पद देखील रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तदनुषंगाने यशवंतराव चव्हाण मुक्त महाराष्ट्र विद्यापीठातील कुलगुरू आणि कुलसचिवांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०४-०५-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील याचिका क्र.१५२५/२०१९ प्रकरणातील निर्देशानुसार कुलगुरु पदाच्या अर्हतेमध्ये बदल करणे व कुलगुरु पदाच्या शोध- नि-निवड समितीवर अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा समोवश करणे आवश्यक झाल्याने तशी सुधारणा सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये करण्यात आली असून त्यानुसार कुलगुरु निवडीची प्रक्रिया मा. राज्यपाल यांचे कार्यालयाद्वारे लवकर पाड पाडण्यात येत आहे. सदर विद्यापीठातील कूलसचिव पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुंबई, ठाणे व भिवंडी येथील म्हशीच्या दूध आणि पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीत शिसे, पारा धातूचे प्रमाण आढळल्याबाबत

**(२०) ४८८२८ (०५-०७-२०१९) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळच्या पशुवैद्यकिय कॉलेजच्या फार्माकोलॉजी आणि विष विज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई, ठाणे व भिवंडीच्या तब्येलात जाऊन म्हशीच्या दूध आणि पाण्याच्या नमुन्यांची तपासणी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तपासणीत शिसे, पारा अशा धातूंचे प्रमाण आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तपासणीनुसार संबधित तबेला मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) पशुवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संशोधनाचा भाग म्हणून मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी माहे मार्च २०१८ ते माहे मे, २०१८ या कालावधीत मुंबई व ठाणे जिल्हयातील बोरीवली, गोरेगांव, भिवंडी व ठाणे येथील विविध तबेल्यातुन प्राथमिक सर्वेक्षणासाठी दुधाचे नमुने घेतले होते.

हे प्राथमिक स्वरुपाच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून केलेले सर्वेक्षण असून, नमूऩ्यांची संख्या ही अत्यल्प आहे. सदरहू संर्वेक्षण संशोधनात सखोल अभ्यासक्रम अंर्तभुत केला नसल्या कारणाने प्राथमिक प्रयोगाअंती कोणताही निष्कर्ष काढण्यात आलेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.